## महिन्याचा विचार

याहून अधिक आश्चर्याची बाब म्हणजे ज्या पध्दतीने गुरूदेवांनी एका आचाऱ्याचे आश्रमात स्वागत केले ते स्तिमित करणारे होते. खरं तो आचारी आश्रमात कायम राहण्यासाठी आलेला नव्हता. मात्र भेटल्यावर गुरूदेवांनी ज्या प्रकारे त्याचे स्वागत केले त्यामुळे तो आश्चर्यचकित झाला. ''येथेच राहा. आसपास आपण एखादे रेस्टॉरंट उघडा. मी शक्य ती मदत आपल्याला करेन.'' यानंतर गुरूदेवांनी त्या आचाऱ्याला आश्रमात एक खोली दिली आणि आपल्या मदतनीसला आवश्यक ती भांडी – कुंडी पुरविण्याची सूचना केली. ''आपण आश्रमात भोजन करू शकता आणि आपला अर्थार्जनासाठी व्यवसाय करू शकता.'' काही काळानंतर गुरूदेवांनी खुलासा केला ''ऋषिकेशला गंगेकाठी आश्रमात राहणे हे मोठे भाग्य आहे.कदाचित काही दिवसांनी जगाला मार्ग दाखविण्याची उर्मी त्याच्यात जागृत होईल. तोपर्यंत पैसे कमविण्याच्या त्याच्या महत्वाकांक्षेला प्रोत्साहन देण्यात काय गैर? आधी त्याला इथे राहू देत, मग हळूहळू तो अध्यात्मिक मार्गाकडे वळेल.''

कामाच्या नव्हे तर अध्यात्माच्या वाटेवरही स्वता:च्या कुवतीनुसार आणि कलानुसार प्रत्येक साधकाला उत्क्रांत होण्यासाठी आवश्यक असलेले अवकाश, वातावरण निर्माण व्हावे याची गुरूदेव काळजी घेत असत. कधीही साधकांवर आपल्या अध्यात्मिक संकल्पना ते लादत नसत. एखाद्याला वेदांताची आवड असेल तर त्याला अध्ययनासाठी आवश्यक असलेल्या सगळ्या सुखसोयी पुरविल्या जात,त्याला इतर कोठलेही काम सोपविले जात नसे. त्यायोगे निवांत एकाग्रचित्ताने अध्ययन करून तो साधक हळूहळू विकसित होत असे. ते खुल्या दिलाने अशा साधकाचे कौतुक करीत आणि योग वेदांत फॉरेस्ट अकादमी मध्ये त्याला शिक्षक बनवीत.

अध्यात्मिक साधनेच्या पथावर असलेल्या इतरही साधकांना गुरूदेव अशाच प्रकारे साहाय्य करीत ऋषिकेशच्या वास्तव्यात साधना मार्गात काही भाग्यवंत साधकांचा वेळ आणि किमती मानसिक ऊर्जा सामान्य सुखसोयींच्या शोधात वाया जाऊ नये आणि निवडलेला साधना–मार्ग त्यांनी अवलंबावा असे गुरूदेवाचे प्रयत्न असत.अर्थात सगळेच साधक ईशप्राप्तीच्या तळमळीने त्यांच्या आश्रयाला असत असे अजिबात नव्हते. काहीजण आधुनिक संस्कृतीचे, सभ्यतेचे पाईक असत आणि त्यांच्यात काही ना काही पापांचे विष आधीच पसरलेले असे. ऋषिकेशच्या वाटेवर असतांना हे विष त्यांनी त्यागलेले नसायचे. अशांच्या बाबतीत गुरूदेवांची प्रतिक्रिया काय असायची? ते स्वत: सत्कृत्याचे रूप होते,त्यांच्या आसपास कोठल्याही वाईट गोष्टीची सावलीही फिरकत नसे. प्रत्येक नव्या आश्रमवासीमधील फक्त चांगले बघण्याची त्यांना सवय होती. वाईटाकडे त्यांची नजरही जात नसे. प्रत्येकामध्ये काहीतरी चांगले असतेच म्हणून गुरूदेव वाईटाला थारा न देता स्वत:च्या अध्यात्मिक सेनेमध्ये नव्या शिपायाला रूजू करून घेत. एखादा वरवरचा दोष असेल (उदा.खाण्याच्या सवयी) तर तो आपोआप आसपासच्या अध्यात्मिक वातावरणात विरघळून जाई. अगदीच खोलवर रूजलेली सवय असेल तरीही गुरूदेवांचे दैवी हात अशा साधकाला वर उचलून घेत आणि त्यांचे उन्नयन साध्य होई. जगाने तुच्छतेने वाळीत टाकलेल्या एखाद्या व्यक्तीचे रूपांतर गुरूदेव सहजगत्या जबाबदार नागरिकामध्ये करीत असत. यामागील जादू सोपी होती– चांगुलपणावर भर द्या आणि त्या गुणांचा विस्तार करा. याचा फायदा सर्व संबंधितांना होतो. एखाद्याला वाईट, दूष्ट, पापी म्हणून झिडकारले तर ती खूप मोठी हानी असते. गुरुदेवांनी असे केल्याचे माझ्या कधीच पाहण्यात नाही. एखाद्या दुष्टाच्याही हातून गुरूदेव काही ना काही चांगले कर्म करून घेत.(क्रमश:)

- Swami Sivananda's Integral Yoga
- By Swami Venkatesananda

## RELIGIONS

***"A proper understanding of the essential unity of***

***religions is the most effective and powerful factor in bringing about peace***

***in this world. It will remove all superficial differences and conflicts,***

***which create restlessness, discord and quarrels. "***

– Swami Sivananda

Strive with calmness and courage to overcome all adversities. Repose thy faith in God. To make effort is man's duty. Results are safe in Divine hands. Wisdom and Justice prevail in Divine dispensation. Earnestly act with optimism and good cheer. Rely on God and do the needful.

**- Swami Chidananda**



## दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत

- ✼ ऑक्टोबर महिन्याचा सत्संग दि. १७ तारखेला संमिश्र (हायब्रीड) झाला.
- ✼ ''दिव्य जीवन'' या आपल्या मासिकपत्रिकेचा ऑक्टोबर महिन्याचा अंक परिवारातील सदस्यांना हार्ड आणि सॉफ्ट कॉपी तसेच व्हॉट्सअप द्वारे पाठविण्यात आला.
- ✼ कोरोनाने थोडी उसंत दिल्याने आणि हळूहळू सर्व व्यवहार सुरळीत होऊ लागल्याने २०२१ ची राहिलेली आंतरशालेय निबंध स्पर्धा डिसेंबर २०२१ मध्ये घेण्याचे योजिले आहे.

## पुणे शाखेचा पत्ता

श्री.नितीन देशपांडे
'ईशावास्य' प्लॉट नं. ४९/सायंतारा, डी.एस.के.
विश्व, धायरी, पुणे ४११०६८,
मो.नं. ९८५०९३१४१७

बुक पोस्ट

प्रति





# दिव्य जीवन



वर्ष १६/अंक ११
नोव्हेंबर २०२१

### DIPAVALI MESSAGE

The Dipavali Vrata is observed every year on the fourteenth day (Chaturdasi) of the dark-fortnight in the month of Kartika (October-November). People take a holy oil bath, put on new clothes, eat delicious dishes. Crackers are burst and lines of light are lit everywhere. There is an atmosphere of gaiety and sanctity. Goddess Lakshmi is worshipped and Divine grace is invoked.

So, the sum and substance of the message connected with Dipavali is that it is a three day festival, beginning with Naraka Chaturdasi, a day prior to Amavasya; then the main Lakshmi worship day, which is Amavasya itself; and the third day which is Bali Pratipada connected with the honour bestowed upon Bali Chakravarti as a devotee of Bhagavan Narayana. It is also an occasion for spiritual exhilaration, a lighting up of all darkness, socially as well as personally, outwardly and inwardly, for the purpose of allowing an entry of the Supreme Light of God into the hearts of all people.

**- SWAMI KRISHNANDA**